सचिन वाझेला उच्च न्यायालयाचा दिलासा

जामीन मंजूर, मात्र तुरुंगातून सुटका नाही । १०० कोटी खंडणी वसुली प्रकरण

। **मुंबई** : १०० कोटींच्या खंडणी वसुली प्रकरणी अटकेत असलेल्या बडतर्फ पोलीस अधिकारी सचिन वाझेला उच्च न्यायालयाने मोठा दिलासा दिला. न्यायमूर्ती महेश सोनक आणि न्यायमूर्ती जितेंद्र जैन यांच्या खांडपीठाने यापूर्वी राज्याचे माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्यासह इतर आरोपींना जामीन मिळाल्याने त्याच आधारे वाझेने जामीन मंजूर केला. या प्रकरणात जामीन मिळाला तरी अँटिलिया स्फोटके व मनसुख हिरेन प्रकरणात जामीन मिळाला नसल्याने वाझे याची तुरुंगातून मात्र सुटका नाही.

१०० कोटींच्या खंडणी वसुली प्रकरणात माफीचा साक्षीदार करण्यात आले आहे, तर अन्य आरोपी जामिनावर बाहेर आहेत. मला तुरुंगात का ठेवण्यात आले आहे. आतातरी मला जामीन द्या. अशी विनंती करत ॲड. रौनक नाईक यांच्या मार्फत जामिनासाठी याचिका केली आहे. या याचिकेवर न्यायमूर्ती भारती डांगरे आणि यांच्या खंडपीठाने वाझेच्या याचिकेवर अंतरिम आदेश देण्यास नकार दिला. तसेच अन्य खंडपीठाकडे जाण्यास सांगितले होते.

पाच महिने निर्णयाच्या प्रतीक्षेत

वाझे याने सर्वप्रथम मे महिन्यामध्ये अन्य आरोपींना जामिनावर सोडले, मलाही जामीन द्या, अशी विनंती सुट्टीकालीन खंडपीठासमोर याचिका दाखल केली होती. त्यानंतर न्यायमूर्ती भारती डांगरे आणि न्यायमूर्ती मंजुषा देशमुख यांच्या खंडपीठासमोर सुनावणी पूर्ण झाली. मात्र, खंडपीठाने दोन महिन्यांपूर्वी निर्णय देण्यास असमर्थता दर्शवत अन्य खंडपीठाकडे दाद मागण्याचे निर्देश दिले. त्यानंतर आता वाझेच्या याचिकेवर न्यायमूर्ती महेश सोनक यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली.

वाझे हा अँटिलिया बंगल्याबाहेर सापडलेली स्फोटके आणि ठाण्यातील व्यापारी मनसुख हिरेन हत्या प्रकरणातही आरोपी आहे. वाझेला राष्ट्रीय तपास यंत्रणेने (एनआयए) मार्च २०२१ मध्ये व्यापारी मनसुख हिरेन हत्या तसेच अँटिलिया स्फोटके प्रकरणात अटक केली होती. तेव्हापासून तो तळोजा तुरुंगात कैद आहे.

त्यानंतर न्यायमूर्ती महेश सोनक आणि न्यायमूर्ती जितेंद्र जैन यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. मागील सुनावणीच्या वेळी खंडपीठाने वाझेने जामिनावर सुटका करण्याबरोबरच फौजदारी दंड संहितेचे कलम ३०६ (४) (बी) घटनाबाह्य असल्याचा दावा केला आहे. हे कलम रद्द करण्याची विनंती केली आहे. याची दखल घेत जामीन मिळाल्यानंतर या कलमाच्या वैधतेच्या सुनावणीसाठी याचिका कायम ठेवणार का? अशी विचारणा केली होती. या वेळी केंद्र सरकारच्या वतीने ॲड. राजा ठाकरे यांनी वाझेला जामीन देण्यावर आक्षेप नसल्याचे स्पष्ट केले. याची दखल घेत खंडपीठाने जामीन मंजूर केला.

खेड शिवापूरजवळ पकडलेल्या पाच कोटींच्या रकमेचा तपास आयकर विभागाकडे

। **पुणे** : खेड शिवापूर टोलनाका परिसरात सोमवारी (दि. २१) मध्यरात्री खासगी वाहनातून जप्त करण्यात आलेली पाच कोटींची रोकड पोलिसांनी आयकर विभागाकडे सोपवली असून, या विभागाकडून पुढील तपास जारी करण्यात आला आहे.

पुणे-सातारा रस्त्यावरून चाललेल्या वाहनांची तपासणी करताना पोलिसांना एका कारमध्ये तब्बल पाच कोटी रुपयांची रोकड हाती लागली. त्यामध्ये पाचशे रुपयांच्या आणि चलनातून बाद करण्यात आलेल्या दोन हजारांच्या नोटांचा समावेश आहे. कारमधील दोन जणांची पोलिसांनी चौकशी केली असता एका बांधकाम ठेकेदाराच्या व्यवहारातील ही रक्कम असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. या संदर्भात अधिकृत प्रक्रियेनुसार ही रक्कम व चौकशीचा प्राथमिक अहवाल आयकर विभागाकडे देण्यात आला, अशी माहिती पोलीस अधीक्षक पंकज देशमुख यांनी माध्यमांना दिली.

दरम्यान, याप्रकरणी राजकीय वतुर्ळात उलटसुलट चर्चांना वेग आला आहे. शिवसेनेचे (उबाठा) प्रवक्ते खासदार संजय राऊत, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी ही रोकड सांगोल्याचे आमदार शहाजीबापू पाटील यांची असल्याचा आरोप केला आहे. तसेच, पोलिसांनी केवळ एक गाडी पकडली, अन्य चार वाहनांतील रक्कम पाटील यांच्या घरी पाठवण्यात आल्याचाही आरोप करण्यात आला आहे. दरम्यान, आमदार पाटील यांनी या रकमेचा आपल्याशी काही संबंध नसल्याचे स्पष्ट केले आहे.

अंतरवाली सराटीत उद्या इच्छुकांची बैठक

। **वडीगोद्री** : मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे-पाटील यांनी विधानसभा निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक असलेल्या संभाव्य उमेदवारांची गुरुवार, २४ ऑक्टोबर रोजी अंतरवाली सराटी येथे महत्त्वाची बैठक बोलावली आहे. या बैठकीला इच्छुकांनी आवर्जून उपस्थित राहावे, असे आवाहन त्यांनी केले. या बैठकीत ते इच्छुकांची मते जाणून घेऊन पुढील दिशा ठरवणार आहे.

आचारसंहिता लागू होण्यापूर्वी जरांगे-पाटील यांनी सरकारला अल्टीमेटम दिला होता; परंतु सरकारने कोणताही निर्णय घेतला नाही. त्यानंतर आचारसंहिता लागू. त्यामुळे जरांगे-पाटील यांनी २० ऑक्टोबर रोजी अंतरवाली सराटी येथे समाजबांधवांची बैठक घेऊन लढायचे की पाडायचे, याची चाचपणी केली. यावेळी २८८ मतदारसंघांसाठी ८०० जणांचे अर्ज आले होते. त्यामुळे ज्या मतदारसंघात मराठा समाजाचे प्राबल्य आहे, तेथे उमेदवार देण्याचा, समाजाच्या विचारांशी सहमत असलेल्या आणि समाजाच्या मागण्या मंजूर करण्यासाठी पाठपुरावा करण्याचे लेखी आश्वासन बॉण्डवर देणाऱ्या उमेदवारांच्या पाठीमागे राहण्याचा आणि अनुसूचित जाती, जमाती मतदारसंघात उमेदवार देण्याऐवजी मागासवर्गीय उमेदवाराला निवडून आणण्याचा निर्णय घेण्यात आला. मंगळवारी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना जरांगे-पाटील यांनी येत्या २४ तारखेला अंतरवाली सराटी येथे इच्छुकांची बैठक बोलावल्याची माहिती दिली. ज्यांना ज्यांना निवडणूक लढवायची त्यांनी बैठकीला आवर्जून यावे, उमेदवाराची गुणवत्ता पाहूनच पुढील निर्णय घेतला जाणार आहे. आपसात गटतट, मतभेद असले, तरी त्यांनी बैठकीत आपली मते खुल्या मनाने मांडावी, समाजाच्या आंदोलनात प्रत्येकाचे योगदान आहे, ते विसरून चालणार नाही. त्यामुळे प्रत्येक बांधव आपल्यासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. आपण सर्वजन बसून चर्चा करू आणि मगच पुढील दिशा ठरवू, असे ते म्हणाले.

अजित पवार सोमवारी अर्ज दाखल करणार

। **बारामती** : राज्याचे लक्ष लागलेल्या बारामती विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष, उपमुख्यमंत्री अजित पवार सोमवारी (दि. २८) रोजी उमेदवारी अर्ज दाखल करणार असल्याची माहिती अजित पवार यांचे निवडणूक प्रतिनिधी किरण गुजर यांनी दिली.

उपमुख्यमंत्री अजित पवार सात वेळा विधानसभेवर आमदार म्हणून निवडून गेले आहेत. सोमवारी सकाळी १० वाजता उमेदवारी अर्ज दाखल करणार असून, शहरातील कसबा येथून मिरवणूक काढून प्रशासकीय भवन येथील तहसील कचेरीत ते आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. तसेच दुपारी २ वाजता श्रीक्षेत्र कन्हेरी येथे प्रचाराचा शुभारंभ होणार असून, येथे जाहीर सभा होणार आहे. सोमवारी प्रचार सभेत उपमुख्यमंत्री अजित पवार प्रचाराच्या रणनीतीबाबत काय बोलणार याची उत्सुकता आहे.

मुंबई-पुणे महामार्गावर पार्किंग केल्यास होणार कारवाई

एमएसआरडीसीकडून महामार्ग पोलिसांकडे तक्रार

। **मुंबई** : मुंबई-पुणे महामार्गावर विशेषतः घाटात अवजड वाहने अवैधरीत्या पार्किंग करत असल्याचे दिसून आल्यानंतर अशा वाहनांवर कारवाई करण्याची मागणी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने राज्य महामार्ग पोलिसांकडे केली आहे. मागील काही महिन्यांपासून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या ही बाब निदर्शनास आली होती.

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने दिलेल्या माहितीनुसार, मुंबई-पुणे एक्स्प्रेस वे अर्थात ई वेवर मोठ्या प्रमाणात ट्रक तसेच अन्य तत्सम मालवाहू वाहने अवैधरीत्या पार्किंग करत असल्याचे दिसून आले आहे. विशेषतः घाटभागात वाहने थांबवण्यास मज्जाव असूनही अवजड वाहने थांबत असल्याने वाहतूक कोंडीसारख्या समस्या निर्माण झाल्याचे दिसून आले आहे. मुंबई-पुणेदरम्यान ये-जा करणाऱ्या प्रवाशांनी याबाबत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडे तक्रार दाखल केली होती. मुंबई-पुणे महामार्गावर सातत्याने वाहनांची ये-जा सुरू असते, अशा वेळेत अवजड वाहने घाटमाथ्यावर थांबत असल्याने वाहतुकीचा खोळंबा होत असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे एमएसआरडीसीच्या या तक्रारीची गंभीर दखल घेत राज्य महामार्ग पोलिसांनी घाटात किंवा मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर थांबणाऱ्या किंवा अवैधरीत्या पार्किंग करणाऱ्या वाहनचालक व संबंधित संस्थेवर कारवाईचा बडगा उगारण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

ट्रेकिंगसाठी पुण्यावरून आलेल्या व्यक्तीचा मृत्यू

। **नवीन पनवेल** : कलावंतीण दुर्ग येथे मित्रांसह ट्रेकिंगसाठी गेलेल्या पुण्यातील ४७ वर्षीय ट्रेकर्सच्या छातीत दुखून त्याचा मृत्यू झाल्याची घटना घडली. आनंद शहापूरकर असे मृत्यू पावलेल्या ट्रेकर्सचे नाव आहे. आनंद हे त्यांच्या मित्रांसह पनवेल तालुक्यातील कलावंतीण दुर्ग येथे ट्रेकिंगसाठी आले होते. तेथे अचानक आनंद यांच्या छातीत दुखू लागले व ते चक्कर येऊन बेशुद्ध पडले. यावर त्यांना कामोठे येथील एमजीएम हॉस्पिटल येथे उपचारासाठी दाखल केले असता तेथे त्यांचा मृत्यू झाला.

मे. एस. बी. काळे कोर्ट, ९ वे सह दिवाणी न्यायालय व. स्तर, वडगाव मावळ, पुणे

स्पे. मु. क्रं. २०/२०२४
निशाणी क्र. १६२

जाहीर नोटीस

अरुण पांडुरंग जांभुळकर व इतर ... वादी

विरुद्ध

महेश तुकाराम रामगुडे व इतर ...प्र. वादी

४४, आदेश लक्ष्मण शिंदे,
रा. त्रिवेणी संगम बिल्डींग, भवानी शंकर रोड, दादर, प. मुंबई.

नोटीस देण्यात येते की, उपरोक्त वादी यांनी दावा खरेदीखत रद्द करणेकामी तसेच निरंतर मनाईकरिता या न्यायालयात दावा दाखल केला आहे. सदर दाव्यामध्ये ज्या कोणास हरकत घ्यावयाची असेल, त्यांनी नेमलेली तारीख ०५/११/२०२४ रोजी सकाळी ठीक ११:०० वाजता स्वतः किंवा वकिलांमार्फत न्यायालयात हजर राहावे.

आज दिनांक २२/१०/२०२४ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला.

हुकूमान्वये,
सही/-
सहा. अधीक्षक
दिवाणी न्यायालय व. स्तर,
वडगाव मावळ, पुणे

शिक्का

सही/-
क. लिपीक

न्यू कोहिनूर को. ऑप. हौसिंग सोसायटी लि.

नोंदणी क्र.: एम.यु.एम./डब्ल्युएम/एच.एस.जी./(टी.सी.) १००२०/१०-११/२०१०

परिशिष्ट क्र. १६

उपविधी क्रमांक ३५ अन्वये

नोटिस

या नोटीसद्वारे तमाम लोकांना कळविण्यात येते की, वरील संस्थेतील **न्यू कोहिनूर को. ऑप. हौ. सोसा. लि. इमारत क्र. १०/सी, एमएमआरडीए कॉलनी, नटवर पारेख कम्पाऊंड, बोर्ला घाटकोपर–मानखुर्द लिंक रोड, गोवंडी (प.), मुंबई – ४०० ०४३** असून या संस्थेत खालील दिलेल्या विवरण व माहितीप्रमाणे खालील मयत सभासदांच्या नावे सदनिका असून त्यांच्या मृत्यु पश्चात त्यांच्या खालील वारसांनी त्यांच्या नावे सदनिका हस्तांतरीत करणे व संस्थेचे सभासद करून घेण्याकरिता संस्थेकडे लेखी अर्ज केला आहे. संस्थेच्या मयत सभासदाने महाराष्ट्र सहकारी संस्थेच्या कायदा १९६० नियम १९६१ व उपविधीतील तरतदीनुसार संस्थेकडे वारस नोंद केलेली नाही. अर्ज केलेल्या खालील वारसदार व्यतिरिक्त इतर कोणीही मूळ मयत सभासदाचे वारसदार असल्यास किंवा अर्जातील वारसदाराबाबत इतर कोणीही मूळ मयत सभासदाचे वारसदार असल्यास किंवा वारसदाराबाबत इतर कायदेशीर सहवारसदारांची काही हरकत असल्यास अशा वारसदारानी तसेच सदर सदनिकेवर कोणत्याही प्रकारचा बँका, वित्त संस्था किंवा कोणीही व्यक्तीचा कोणत्याही प्रकारचा कायदेशीर बोजा असल्यास अशा व्यक्ती किंवा संस्थांनी सदर जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत वरील संस्थेचे सचिव यांच्याशी पूर्व सूचना व वेळ घेऊन प्रत्यक्ष कायदेशीर मूळ कागदपत्र व पुराव्यासह कार्यालयीन वेळेत सायंकाळी ६ ते ९ या वेळेत संपर्क साधावा. विहीत मुदतीत कोणाचेही कोणत्याही प्रकारचे आक्षेप न आल्यास संस्थेकडे वारसदार म्हणून अर्ज केलेले अर्जदारच त्या मयत सभासदांच्या सदनिकेचे कायदेशीर वारसदार म्हणून अर्ज केलेले अर्जदारच त्या मयत सभासदांच्या सदनिकेचे कायदेशीर वारसदार आहेत, असे समजून संस्था अशा अर्जदार व्यक्तीच्या नावे त्या मयत सभासदाचे भाग व संस्थेतील सदनिका हस्तांतरित करेल व कायदेशीर कार्यवाहीकरीता संबंधीत प्रशासकीय कार्यालयाकडे शिफारस करेल. त्यानंतर कोणाचेही कोणत्याही प्रकारचे अर्ज कार्यकारी मंडळ विचारात घेणार नाहीत किंवा कोणत्याही प्रकारची कायदेशीर नुकसान भरपाई करण्याची जबाबदारी कार्यकारी मंडळाची असणार नाही.

मयत सभासद सदनिकाधारक व त्यांची अर्जदार वारसांची सूची

अनु. क्र.	रूम नं.	मयत सभासदाचे नांव	अर्जदार वारसाचे नांव	नाते
१	103	कै. श्री. यादव रामउजागीर श्रीपाल	श्री. लालचंद रामूजागीर यादव	मुलगा

न्यू कोहिनूर को–ऑप. हौसिंग सोसायटी लि.

शिक्का

सही/- अध्यक्ष | सही/- सेक्रेटरी | खजिनदार

शांती को–ऑप. हौसिंग सोसायटी लि.

नोंदणी क्र. एमयूएम/एमएमआरडीए/एचएसजी/(टीसी)/१७३/सन २००९-१०

जाहीर नोटीस

या नोटीसद्वारे तमाम लोकांना कळविण्यात येते की, शांती को. ऑप. हौ. सोसायटी लि., इ. क्र. १७सी, नटवर पारेख कम्पाऊंड, घाटकोपर-मनखुर्द लिंक रोड, गोवंडी, मुंबई - ४३ या संस्थेचा नों. क्र. एमयुएम / एमएमआरडीए/एचएसजी/ (टि.सी.)/१७३/२००९-१० हा असून संस्थेत खालील दिलेल्या विवरण व माहितीप्रमाणे मयत सभासदांच्या नावे सदनिका असून त्यांच्या मृत्युपश्चात त्यांच्या खालील वारसांनी त्यांच्या नावे सदनिका हस्तांतरीत करणे व संस्थेचे सभासद करून घेण्याकरीता संस्थेकडे लेखी अर्ज केलेले आहेत. संस्थेच्या मयत सभासदाने महाराष्ट्र सहकारी संस्थेचा कायदा १९६० नियम १९६१ व उपविधीतील तरतुदीनुसार संस्थेकडे वारस नोंद केलेली नाही. अर्ज केलेल्या खालील वारसदाराव्यतिरिक्त इतर कोणीही मुळ मयत सभासदाचे वारसदार असल्यास किंवा अर्जातील वारसदाराबाबत इतर कायदेशीर सहवारसदारांनी काही हरकत असल्यास अशा वारसदारांनी तसेच सदर सदनिकेवर कोणत्याही प्रकारचा बँका, वित्त संस्था किंवा कोणाही व्यक्तीचा कोणत्याही प्रकारचा कायदेशीर बोजा असल्यास अशा व्यक्ती किंवा संस्थांनी सदर जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या आत शांती को. ऑप. हौ. सो. लि. संस्थेचे सचिव यांच्याशी पूर्वसूचना व वेळ देऊन प्रत्यक्ष मुळ पुराव्यासह कार्यालयीन वेळेत ७ ते ९ या वेळेत संपर्क साधावा. विहित मुदतीत कोणत्याही प्रकारचे आक्षेप न आल्यास संस्थेकडे वारसदार म्हणून अर्ज केलेला अर्जदारच त्या मयत सभासदांच्या सदनिकेचे कायदेशीर वारसदार आहेत असे समजून संस्था अशा अर्जदार व्यक्तींच्या नावे त्या मयत सभासदाचे भाग व संस्थेतील सदनिका हस्तांतरीत करेल व कायदेशीर कारवाईकरीता संबंधित प्रशासकीय कार्यालयाकडे शिफारस करेल. त्यानंतर कोणाचेही कोणत्याही प्रकारचे अर्ज कार्यकारी मंडळ विचारात घेणार नाही किंवा कोणत्याही प्रकारची कायदेशीर नुकसान भरपाई करण्याची जबाबदारी कार्यकारी मंडळाची असणार नाही.

रूम नंबर	मयत सभासदाचे नांव	अर्जदार वारसाचे नांव	नाते	हस्तांतरण
५०२	धुरीया राजमन शुभीरन	सुमित्रा राजमन धुरीया	पत्नी	

शांती को–ऑप. हौसिंग सोसायटी लि.

शिक्का

सही/- अध्यक्ष | सही/- सचिव | सही/- खजिनदार

श्री साईप्रसाद को. ऑप. हौ. सोसायटी लि.

नोंदणी क्र. एमयुएम/एमएमआरडीए/एचएसजी/(टीसी)/३१३/२०१४-१५

परिशिष्ट क्रमांक १६

उपविधी क्रमांक ३५ अन्वये

नोटिस

या नोटीसद्वारे तमाम लोकांना कळविण्यात येते की, वरील संस्थेतील **श्री साईप्रसाद को. ऑप. हौ. सोसा. लि. इमारत क्र. २२, दिवाण, एमएमआरडीए कॉलनी, वाशीनाका, चेंबूर, मुंबई – ४०० ०७४** असून या संस्थेत खालील दिलेल्या विवरण व माहितीप्रमाणे खालील मयत सभासदांच्या नावे सदनिका असून त्यांच्या मृत्यु पश्चात त्यांच्या खालील वारसांनी त्यांच्या नावे सदनिका हस्तांतरित करणे व संस्थेचे सभासद करून घेण्याकरिता संस्थेकडे लेखी अर्ज केला आहे. संस्थेच्या मयत सभासदाने महाराष्ट्र सहकारी संस्थेच्या कायदा १९६० नियम १९६१ व उपविधीतील तरतदीनुसार संस्थेकडे वारस नोंद केलेली नाही. अर्ज केलेल्या खालील वारसदार व्यतिरिक्त इतर कोणीही मूळ मयत सभासदाचे वारसदार असल्यास किंवा अर्जातील वारसदाराबाबत इतर कोणीही मूळ मयत सभासदाचे वारसदार असल्यास किंवा वारसदाराबाबत इतर कायदेशीर सहवारसदांची काही हरकत असल्यास अशा वारसदारानी तसेच सदर सदनिकेवर कोणत्याही प्रकारचा बँका, वित्त संस्था किंवा कोणीही व्यक्तीचा कोणत्याही प्रकारचा कायदेशीर बोजा असल्यास अशा व्यक्ती किंवा संस्थांनी सदर जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत वरील संस्थेचे सचिव यांच्याशी पूर्व सूचना व वेळ घेऊन प्रत्यक्ष कायदेशीर मूळ कागदपत्र व पुराव्यासह कार्यालयीन वेळेत सायंकाळी ६ ते ९ या वेळेत संपर्क साधावा. विहीत मुदतीत कोणाचेही कोणत्याही प्रकारचे आक्षेप न आल्यास संस्थेकडे वारसदार म्हणून अर्ज केलेले अर्जदारच त्या मयत सभासदांच्या सदनिकेचे कायदेशीर वारसदार म्हणून अर्ज केलेले अर्जदारच त्या मयत सभासदांच्या सदनिकेचे कायदेशीर वारसदार आहेत, असे समजून संस्था अशा अर्जदार व्यक्तीच्या नावे त्या मयत सभासदाचे भाग व संस्थेतील सदनिका हस्तांतरित करेल व कायदेशीर कार्यवाहीकरीता संबंधीत प्रशासकीय कार्यालयाकडे शिफारस करेल. त्यानंतर कोणाचेही कोणत्याही प्रकारचे अर्ज कार्यकारी मंडळ विचारात घेणार नाहीत किंवा कोणत्याही प्रकारची कायदेशीर नुकसान भरपाई करण्याची जबाबदारी कार्यकारी मंडळाची असणार नाही.

मयत सभासद सदनिकाधारक व त्यांची अर्जदार वारसांची सूची

अनु. क्र.	रूम नं.	मयत सभासदाचे नांव	अर्जदार वारसाचे नांव	नाते
१.	502	कै. श्री. रूद्रप्रसाद शीतलाप्रसाद यादव	श्री. विरेन्द्र कुमार यादव	मुलगा

श्री साईप्रसाद को. ऑप. हौ. सोसायटी लि.

शिक्का

अध्यक्ष | सही/- सेक्रेटरी | सही/- खजिनदार

ईसीएल फायनान्स लिमिटेड

Edelweiss | ECL Finance Ltd.

नोंदणीकृत कार्यालय : ५वा मजला, टॉवर ३, विंग बी, कोहिनूर सिटी मॉल, कोहिनूर सिटी, किरोल रोड, कुर्ला (प.), मुंबई–४०० ०७०.
शाखा कार्यालयाचा पत्ता : प्लॉट क्र. ५, ग्लास बॉक्स बिल्डिंग, ४था मजला, डब्ल्यूएचसी रोड, धरमपेठ, नागपूर, महाराष्ट्र–४४० ०१०.

ई–लिलाव – वैधानिक ३० दिवसांची विक्री सूचना

सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ व सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स २००२ अंतर्गत ई–लिलावाद्वारे विक्री.

सर्वसामान्य जनतेस आणि विशेषत: कर्जदार व हमीदारांना याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, **थकीत रक्कम दि. २२.१०.२०२४ रोजीनुसार रक्कम रु. ७,६७,८५,४४२.२४ (रु. सात कोटी सदुसष्ट लाख पंचाऐंशी हजार चारशे बेचाळीस व चोवीस पैसे मात्र) अधिक कर्ज वसुलीच्या तारखेपर्यंतचे पुढील व्याज+कायदेशीर खर्चाच्या वसुलीकरिता खालील निर्देशित मालमत्तेची ''जशी आहे जेथे आहे तत्त्वावर'' व ''जशी आहे जी आहे तत्त्वावर'' विक्री करण्यात येत आहे. सदर मालमत्ता ही दाहिला ट्रेडर्स प्रा.लि. (कर्जदार), धिलीन हर्षद मेहता व पंक्ती हर्षद मेहता (सहकर्जदार) यांच्याद्वारे प्राप्त कर्जाकरिता मे. ईसीएल फायनान्स लिमिटेडकडे गहाण आहे.** प्रतिभूत धनकोंचा खालील निर्देशित प्रतिभूत संपत्तींचा प्रत्यक्ष ताबा आहे. प्रतिभूत धनकोंनी खालील निर्देशित प्रतिभूत संपत्तीचा प्रत्यक्ष ताबा घेतला आहे.

प्रतिभूत संपत्तीचे विवरण	राखीव मूल्य व इरठे	लिलाव दिनांक व वेळ
पुढील विवरणीत जागेचा सर्व तो भाग व भूखंड – व्यावसायिक गाळा क्र. २०३/बी, मोजमापित १२९८ चौ. फूट सुपर बिल्टअप क्षेत्र व जवळपास, दुसरा मजला, इमारतीचे नाव व्हीआयपी प्लाझा, व्हीआयपी प्लाझा को–ऑपरेटिव्ह प्रिमायसेस सोसायटी लिमिटेड येथील, ऑफ अंधेरी–मालाड लिंक रोड, अंधेरी (पश्चिम), मुंबई–४०० ०५३, प्लॉट क्र. ७, ब्लॉक बी धारक जमिनीच्या भूखंडावरील, गाव ओशिवरा, तालुका अंधेरी येथील. बांधकाम वर्ष २००४ असून, इमारतीच्या मजल्यांची संख्या तळ+५ वरचे मजले, अधिक लिफ्ट असे आहे.	**रु. २,४०,१३,०००/–** (रु. दोन कोटी चाळीस लाख तेरा हजार मात्र) **इसारा रक्कम ठेव : रु. २४,०१,३००/–** (रु. चोवीस लाख एक हजार तीनशे मात्र)	**०६.१२.२०२४ रोजी स. ११.०० ते दु. १२.००**
परीक्षण दिनांक व वेळ : दि. १२.११.२०२४ रोजी स. ११.०० ते दु. ३.००	**प्रत्यक्ष ताबा दिनांक : दि. २८.०८.२०२४**	

टीप : १. लिलाव वेबसाइट https://sarfaesi.auctiontiger.net च्या माध्यमातून ऑनलाइन आयोजित करण्यात येईल व केवळ वैध ई–मेल, ओळखीचा पुरावा व छायाचित्राचा पुरावा, पॅन कार्ड असलेले व इरठेचे प्रदान धनाकर्ष/एनईएफटी/आरटीजीएसद्वारे केलेले बोलीदारच केवळ सदर **''ऑनलाइन ई–लिलावात''** सहभागासाठी पात्र असतील.
२. इच्छुक बोलीदारांना खालील स्वरूपात धनाकर्ष/आरटीजीएस व एनईएफटीद्वारे त्यांची इरठे सादर करावी लागेल :
लाभार्थी नाव : ईसीएल फायनान्स लि.,
३. बँक : स्टेट बँक ऑफ इंडिया, खाते क्र. ६१३००८४७९४०, सरफेसी – ऑक्शन, ईसीएल फायनान्स लि., आयएफएससी कोड : एसबीआयएन०००१५९३.
४. इरठेसमवेत ऑनलाइन बोली सादरीकरणाची अंतिम तारीख : ०५.१२.२०२४
५. विक्रीच्या विस्तृत अटी व शर्तींकरिता कृपया वेबसाइट https://sarfaesi.auctiontiger.net येथे संपर्क साधा किंवा **श्री. मौलिक श्रीमाली, दूर. + ९१ ६३५१८९६६४३/९१७३५२८७२७**, हेल्पलाइन ई–मेल आयडी : Support@auctiontiger.net येथे व्यक्तिश: संपर्क साधावा.

मोबाइल क्र. : ९७६८७४६६२४/९००४३५९८३५
दिनांक : २३.१०.२०२४

सही/– प्राधिकृत अधिकारी
ईसीएल फायनान्स लि.

MAHAGENCO Maharashtra State Power Generation Co. Ltd.

NOTICE INVITING e-TENDER

Sr. No.	Tender No.	Tender Details	Estimate Amount Rs.	EMD in Rs.
1	3000052324	Repairing and Servicing of Computer Peripherals, Printers on as and when required basis at Ghatghar HPS	1,88,408.00 /-	5384.00/-

Tender Cost: Rs. 1180.00
Contact Person: Superintending Engineer, RENEWABLE ENERGY CIRCLE, Ghatghar
Tel.No. 0253 2810185/2810485
For further details visit our Web site : https://eprocurement.mahagenco.in
1. All interested vendors are requested to register to our web site for e-tender : https://eprocurement.mahagenco.in
2. Actual quantum of work is to be accessed by the bidder before submitting the tender documents.

Superintending Engineer, REC Ghatghar

आर्य को–ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि.

नोंदणी क्र.: बीओएम–२/डब्ल्यूएल/एचएसजी/टीसी/८६०५/ २०००–२००१/सन २०००, दिनांक ५/६/२०००
प्लॉट नं. १०५/१, न्यू मिल रोड, कुर्ला (पश्चिम), मुंबई- ४०० ०७०

मिळकतीच्या मानीव अभिहस्तांतरणासंबंधी जाहीर सुचना

(अर्ज क्रमांक ८४/२०२४)

खालील मिळकतीचे एकतर्फी मानीव अभिहस्तांतरण करून मिळणेबाबत उपरोक्त संस्थेकडून या कार्यालयाकडे महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकाबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्याची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ चे कलम ११ अन्वये अर्ज प्राप्त झाला आहे. सदर अर्जाची पुढील सुनावणी **दिनांक – ०७/११/२०२४ रोजी दुपारी १.३० वाजता** निश्चित केली आहे.

प्रतिवादी क्र. – १) श्रीमती प्रेमदिनानाथ पहुजा उर्फ श्रीमती प्रेम दिनानाथ पहुजा, २) नलिन ओमप्रकाश पहुजा उर्फ श्री. नलिन ओमप्रकाश पहुजा, क्र. १ व २ यांचा पत्ता : ६०२, मनिषा अपार्टमेंट, चर्च रोड, मरोळ, अंधेरी (पूर्व), मुंबई- ४०० ०५९ आणि सीटीएस नं. १०५, १०५/१ ते १०५/२०, व्हीलेज कुर्ला विभाग-४, तालुका-कुर्ला, **३) कटारिया को–ऑप. हौसिंग सोसायटी लि.,** (विंग बी-फेस-१), प्लॉट नं. १०५/१, न्यु मिल रोड, कुर्ला (पश्चिम), मुंबई - ४०० ०७० यांनी तसेच या मिळकतीबाबत ज्या कोणाचे हितसंबंध असतील त्यांनी त्यांचे म्हणणे वरील सुनावणीचे दिवशी व वेळी हजर राहुन सादर करावे. अन्यथा या प्रकरणी कोणाची काहीही हरकत नाही, असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

मालमत्तेचे वर्णन :– आर्य को - ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि. या संस्थेची इमारत व खालील तपशीलात नमुद केलेली जमीन मिळकत

सर्व्हे नं.	हिस्सा नं.	प्लॉट नं.	सी.टी.एस. नं.	मागणी केलेले क्षेत्र
--	--	--	१०५, १०५/१ ते १०५/२० मौजे कुर्ला, विभाग-४, ता. कुर्ला	६६०.०८ चौ. मी.

जा.क्र./जिऊनि/मुंबई/नोटीस/२२९१/सन २०२४
सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (२)
पूर्व उपनगरे, मुंबई
कार्यालय :- कक्ष क्र. २०१, कोकण भवन,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई-४०० ६१४.
दिनांक : २२/१०/२०२४, दूरध्वनी क्र.: ०२२-२७५७४९६५
Email : ddr2coopmumbai@gmail.com

शिक्का

सही/-
(नितीन दहिभाते)
सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (२), पूर्व उपनगरे, मुंबई करीता

बेस्ट राजहंस को–ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि.

नोंदणी क्र.: बीओएम/एचएसजी/६१४९/१९८०–८१ दिनांक ३०/८/१९८०
सीटीएस नं. १बी (पार्ट), बेस्ट नगर, घाटकोपर बस डेपो जवळ, अनिल उभारे मार्ग, घाटकोपर (पूर्व), मुंबई- ४०० ०७५

मिळकतीच्या मानीव अभिहस्तांतरणासंबंधी जाहीर सुचना

(अर्ज क्रमांक ८३/२०२४)

खालील मिळकतीचे एकतर्फी मानीव अभिहस्तांतरण करून मिळणेबाबत उपरोक्त संस्थेकडून या कार्यालयाकडे महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकाबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्याची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ चे कलम ११ अन्वये अर्ज प्राप्त झाला आहे. सदर अर्जाची पुढील सुनावणी **दिनांक – ०७/११/२०२४ रोजी दुपारी १.३० वाजता** निश्चित केली आहे.

प्रतिवादी क्र. – दि बृहन्मुंबई इलेक्ट्रीक सप्लाय ॲण्ड ट्रान्सपोर्ट (बेस्ट), बेस्ट भुवन, कुलाबा, मुंबई - ४०० ००१ यांनी तसेच या मिळकतीबाबत ज्या कोणाचे हितसंबंध असतील त्यांनी त्यांचे म्हणणे वरील सुनावणीचे दिवशी व वेळी हजर राहुन सादर करावे. अन्यथा या प्रकरणी कोणाची काहीही हरकत नाही, असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

मालमत्तेचे वर्णन :– बेस्ट राजहंस को - ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि. या संस्थेची इमारत व खालील तपशीलात नमुद केलेली जमीन मिळकत

सर्व्हे नं.	हिस्सा नं.	प्लॉट नं.	सी.टी.एस. नं.	मागणी केलेले क्षेत्र
--	--	--	१/बी (पार्ट) मौजे विक्रोळी, ता. कुर्ला	११२०२.०० चौ. मी.

जा.क्र./जिऊनि/मुंबई/नोटीस/२२८९/सन २०२४
सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (२)
पूर्व उपनगरे, मुंबई
कार्यालय :- कक्ष क्र. २०१, कोकण भवन,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई-४०० ६१४.
दिनांक : २२/१०/२०२४, दूरध्वनी क्र.: ०२२-२७५७४९६५
Email : ddr2coopmumbai@gmail.com

शिक्का

सही/-
(नितीन दहिभाते)
सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (२), पूर्व उपनगरे, मुंबई करीता

निडो होम फायनान्स लिमिटेड

nido HOME FINANCE

(पूर्वीची एडलवाइज हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)
नोंदणीकृत कार्यालय : टॉवर ३, पाचवा मजला, विंग बी, कोहिनूर सिटी मॉल, कोहिनूर सिटी, किरोल रोड, कुर्ला (प.), मुंबई–४०० ०७०

ई–लिलाव – वैधानिक ३० दिवसांची विक्री सूचना

सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ व सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स २००२ अंतर्गत ई–लिलावाद्वारे विक्री.

सर्वसामान्य जनतेस आणि विशेषत: कर्जदार व हमीदारांना याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, थकीत कर्जाच्या वसुलीकरिता खालील तक्त्यामध्ये निर्देशित वसुली रकमेकरिता खालील निर्देशित मालमत्तेची **''जशी आहे जेथे आहे तत्त्वावर''** व **''जशी आहे जी आहे तत्त्वावर''** विक्री करण्यात येत आहे. सदर मालमत्ता ही कर्जदार, सहकर्जदार, हमीदार यांच्याद्वारे प्राप्त कर्जाकरिता **निडो होम फायनान्स लिमिटेड** (पूर्वीची एडलवाइज हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात) यांच्याकडे गहाण आहे. प्रतिभूत धनकोंचा खालील निर्देशित प्रतिभूत संपत्तींचा प्रत्यक्ष ताबा आहे.

कर्जदार/सहकर्जदार/हमीदाराचे नाव	वसुली रक्कम	राखीव मूल्य व इरठे	लिलाव दिनांक व वेळ
वैभव विलास वाघमारे (कर्जदार), प्रियांका वैभव वाघमारे (सहकर्जदार)	एलएएन नं. : **एलकेओएच०यूसी०००००८६६२५** करिता दि. २२.१०.२०२४ रोजीनुसार **रु. ४८,८०,८१८.०८/–** (रु. अठ्ठेचाळीस लाख ऐंशी हजार आठशे अठरा व आठ पैसे मात्र) अधिक त्यावरील पुढील व्याज+कायदेशीर खर्च.	**रु. ५७,६०,०००/–** (रु. सत्तावन्न लाख साठ हजार मात्र) **इसारा ठेव रक्कम : रु. ५,७६,०००/–** (रु. पाच लाख शहात्तर हजार मात्र)	**०६.१२.२०२४ रोजी स. ११.०० ते दु. १२.०० वा. (प्रत्येकी ५ मिनिटांच्या अमर्यादित विस्तारासह)**
परीक्षणाचा दिनांक व वेळ : दि. ११.११.२०२४ रोजी स. ११.०० ते दु. ३.००		**प्रत्यक्ष ताबा दिनांक : दि. २०.०९.२०२४**	
प्रतिभूत संपत्तीचे विवरण : पुढील विवरणीत मालमत्तेचा सर्व तो भाग व भूखंड : फ्लॅट क्र. १५०६, १५वा मजला, मोजमापित ५९.६१ चौ. मीटर चटई क्षेत्रफळ अधिक खुली टेरेस ५.५८ चौ. मी., विंग सी, ''कृष्ण निसर्ग'' नावाने ज्ञात इमारत स्कीममधील, सर्व्हे क्र. ५३, हिस्सा क्र. २ धारक जमिनीवर निर्मित, गाव तिसगाव, तालुका कल्याण, जिल्हा ठाणे व कल्याण–डोंबिवली महानगरपालिका हद्दीतील व नोंदणीकरण जिल्हा व उपनोंदणीकरण जिल्हा कल्याण यांच्या कार्यकक्षेतील.			

टीप : १. लिलाव वेबसाइट https://sarfaesi.auctiontiger.net च्या माध्यमातून ऑनलाइन आयोजित करण्यात येईल व केवळ वैध ई–मेल, ओळखीचा पुरावा व छायाचित्राचा पुरावा, पॅन कार्ड असलेले व इरठेचे प्रदान धनाकर्ष/एनईएफटी/आरटीजीएसद्वारे केलेले बोलीदारच केवळ सदर **''ऑनलाइन ई–लिलावात''** सहभागासाठी पात्र असतील.
२. इच्छुक बोलीदारांना खालील स्वरूपात धनाकर्ष/आरटीजीएस व एनईएफटीद्वारे त्यांची इरठे सादर करावी लागेल :
लाभार्थी नाव : निडो होम फायनान्स लिमिटेड,
बँक : स्टेट बँक ऑफ इंडिया, खाते क्र. ६५२२६८४५११९, सरफेसी – ऑक्शन, निडो होम फायनान्स लिमिटेड, आयएफएससी कोड : एसबीआयएन०००१५९३.
३. इरठेसमवेत ऑनलाइन बोली सादरीकरणाची अंतिम तारीख : ०५.१२.२०२४.
४. विक्रीच्या विस्तृत अटी व शर्तींकरिता कृपया वेबसाइट https://sarfaesi.auctiontiger.net येथे संपर्क साधा किंवा **श्री. मौलिक श्रीमाली यांना दूर. क्र. + ९१ ६३५१८९६६४३/९१७३५२८७२७**, हेल्पलाइन ई–मेल आयडी : Support@auctiontiger.net येथे व्यक्तिश: संपर्क साधावा.

मोबाइल क्र. : ९००४३५९८३५/९७६८७४६६२४
दिनांक : २३.१०.२०२४

सही/– प्राधिकृत अधिकारी
निडो होम फायनान्स लिमिटेड
(पूर्वीची एडलवाइज हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)